# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

## महानुभाव साहित्याचा अभ्यास सर्वांगानी व्हावा - प्रा. पुरुषोत्तम नागपुरे
## महानुभाव साहित्य संमेलनाचा समारोप संपन्न

अमरावती.

महानुभाव साहित्य सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रामध्ये क्रांती घडवून आणण्यास जबाबदार असलेले साहित्य असून महानुभाव साहित्याचा अभ्यास सर्वांगानी व्हावा, असे प्रतिपादन अमरावतीचे महानुभाव साहित्य संशोधक व लेखक पुरुषोत्तमदादा कारंजेकर उपाख्य प्रा. पुरुषोत्तम नागपुरे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा महानुभाव पंथ केंद्र आणि विद्याभारती महाविद्यालयाचा मराठी विभाग यांचे संयुक्त विद्यमाने महानुभाव साहित्य संमेलनाचे आयोजन विद्याभारती महाविद्यालयाच्या दृकश्राव्य सभागृहात करण्यात आले होते, त्याप्रसंगी सहाव्या सत्राचे समारोपीय अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर अतिथी म्हणून अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष आचार्य श्री गोपीराजबाबा शास्त्री महानुभाव, विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुख डॉ. मनोज तायडे, श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्ट, किरणनगर, अमरावतीचे अध्यक्ष श्री दादारावजी भडके, आचार्य श्री सानकरबाबा (धुळे), महंत श्री मोहनदादा अमृते, विद्याभारती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एफ.सी. रघुवंशी, नागपूर आकाशवाणीच्या माजी निदेशिका सु.श्री. केशरताई मेश्राम, संमेलनाचे संयोजक डॉ. सतीश तराळ, विद्यापीठाच्या महानुभाव पंथ केंद्राचे समन्वयक डॉ. राजेंद्र सोनपेठकर उपस्थित होते.

प्रा. पुरुषोत्तम नागपुरे म्हणाले, महानुभाव साहित्यातील संपूर्ण भारतामध्ये सर्वात पहिले लिहीलेला गद्य ग्रंथ लीळाचरित्र आहे. महानुभाव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामी यांनी समाजामध्ये समता प्रस्थापित करत असतांना पहिल्यांदाच तत्कालीन समाजातील उच्चवर्णीय पंडीतांना आपल्या ब्रम्हविद्या शास्त्राचा अभ्यास सांगितला व पुढे त्यांच्याच माध्यमातून समाजातील इतर अनेक घटकापर्यंत तत्वज्ञान अगदी साध्या व सोप्या पद्धतीने पोहोचविण्याचे अतुलनीय कार्य केले. पुढे म्हणाले, अनेक विदेशी लोक रिद्धपूर येथे येवून या साहित्याचा अभ्यास करतात, परंतु स्थानिक विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक या साहित्याचा अभ्यास करत नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

संमेलनाच्या दुसऱ्या चवथ्या सत्रात ‘सूत्रपाठ दृष्टांतपाठातील लालित्य व तत्वदर्शन’ या विषयावर प्रसिद्ध जनसाहित्यिक डॉ. सुभाष सावरकर यांचे अध्यक्षतेखाली परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादामध्ये कढी महाविद्यालय, परतवाडा येथील मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. काशिनाथ वऱ्हाटे, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, भातकुली येथील सहयोगी प्राध्यापक अंबादास घुले, समर्थ कनिष्ठ महाविद्यालय, अमरावती येथील प्रा. राजेंद्र राऊत, महानुभाव पंथ केंद्राचे समन्वयक डॉ. राजेंद्र सोनपेठकर यांनी अभ्यासपूर्ण व विस्तृत सूत्रपाठ दृष्टांतपाठातील विविध लालित्य व तत्वदर्शन उपस्थित श्रोत्यांपुढे समर्पक शब्दांत मांडले.

परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. सुभाष सावरकर यांनी महानुभाव साहित्यातील सूत्रपाठ दृष्टांतपाठातील लालित्य व तत्वदर्शन जनसाहित्याच्या अंगांनी किती आणि कसे महत्वपूर्ण ठरते याविषयी आपले विचार व्यक्त केले. परिसंवादाचे सूत्रसंचालन विद्याभारती महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ. गजानन बनसोड यांनी, तर आभार डॉ. अण्णा वैद्य यांनी मानले.

पाचव्या सत्रामध्ये ‘महानुभावीय चरित्रग्रंथातील जीवनमूल्ये व साहित्यमूल्ये’ या विषयावर प्रसिद्ध कथाकार, साहित्यीक डॉ. सतिश तराळ यांचे अध्यक्षतेखाली परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादामध्ये भारतीय महाविद्यालयातील डॉ. अलका गायकवाड, बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. सुशिला धाबे, मातोश्री विमलताई देशमुख महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. मंदा नांदुरकर यांनी महानुभावीय चरित्रग्रंथातील विविध जीवनमूल्ये व साहित्यमूल्ये अनेक अंगांनी उपस्थित श्रोत्यांपुढे अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडली.

परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. सतिश तराळ यांनी विषयावर प्रकाश टाकतांना सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी व श्री गोविंदप्रभू यांच्या आचरणातून आणि विविध लिळांमधून व्यक्त होणारी जीवनमूल्ये व साहित्यमूल्यांचे विस्तृत विवेचन करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. साहित्य संमेलनामध्ये पारीत करण्यात आलेल्या विविध ठरावांचे वाचन सुद्धा डॉ. सतीश तराळ यांनी केले. परिसंवादाचे सूत्रसंचालन डॉ. कल्पना मेहरे यांनी, तर आभार श्री संदीप जुनघरे यांनी केले.

आचार्य साळकरबाबा (धुळे) यांनी संमेलानिमित्त शुभेच्छापर विचार व्यक्त केले. प्रसिद्ध वक्ते डॉ. मनोज तायडे यांनी संत साहित्याच्या व्यासंगी अभ्यासक म्हणून विस्तृत विवेचन केले. आचार्य गोपीराजशास्त्री महानुभाव यांनी महानुभावांचे साहित्य दार्शनिकदृष्ट्या किती महत्वाचे असते, हे उपस्थितांना पटवून दिले. समारोपीय समारंभाचे प्रास्ताविक संमेलनाचे संयोजक डॉ. सतिश तराळ यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन श्री संदीप जुनघरे यांनी, तर आभार डॉ. राजेंद्र सोनपेठकर यांनी मानले.

---

प्रति,

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**

दि. ३०/०४/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी